आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

११ एप्रिल २०२६ -शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त देशभरात अभिवादन, २०० व्या जयंती वर्षात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- केंद्र सरकारकडून डिझेल आणि विमान इंधनावरच्या निर्यात शुल्कात वाढ, महिनाभरात देशातल्या ४ लाखांहून अधिक ग्राहकांची पाइप गॅसला पसंती

- अमेरिका आणि इराणमधल्या चर्चेला इस्लामाबादमध्ये सुरुवात

**आणि**

- अमेरिकेनं चांद्रमोहिमेवर पाठवलेलं ओरायन अंतराळयान ४ अंतराळवीरांसह पृथ्वीवर परत

**<><><><><><>**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त देशभरात त्यांना आदरांजली वाहण्यात आली. संसद भवन परिसरात प्रेरणा स्थळी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य मान्यवरांनी फुले यांना आदरांजली वाहिली. इतर कार्यक्रमांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड कॅप्सूल**

*(राज्य सरकारनं पुणे जिल्ह्यातल्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या खानवडी गावी नवीन जिल्हा परिषद शाळा सुरू केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज तिचं उद्घाटन केलं. सीबीएसई अभ्यासक्रमावरील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातली पहिली जिल्हा परिषद शाळा आहे. पुढील वर्षापर्यंत इथं २८० विद्यार्थ्यी क्षमतेचे वसतिगृह पूर्ण होणार आहे. २०२९ पासून लोकसभा आणि विधानसभेत 33 टक्के आरक्षण देण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्त्री-शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचं फडणवीस म्हणाले.*

***होल्ड.. बाईट - फडणवीस***

*महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षात शालेय शिक्षण विभाग राज्यातल्या सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय*

*रुजवण्यासाठी शाळांमध्ये वाचनालयं ज्ञानकेंद्र म्हणून विकसित केली जाणार आहेत. तसेच फुले यांच्या विचारांवर आधारित व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्रांचं आयोजन करण्यात येणार आहे.*

*२०२६ या संपूर्ण वर्षभरात विविध उपक्रम आणि सत्यशोधक विचारांचा जागर करण्याची विशेष मोहीम काँग्रेस राज्यभर राबवणार आहे. राज्यभरातही महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.)*

<><><><><><>

प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणाच्या माध्यमातून आता शालेय बसचे शुल्क निश्चित केलं जाणार आहे. नव्या मोटार वाहन कायद्याच्या अंतर्गत परिवहन विभागानं शालेय बस नियमनाच्या संदर्भात नियमावली जाहीर केली आहे. त्यानुसार पालकांकडून केवळ मासिक शुल्क घेतलं जाईल, एकरकमी आगाऊ रक्कम घेता येणार नाही. या नियमांच्यासंदर्भात अधिक जाणून घेऊ, आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(नव्या नियमांनुसार बसमध्ये विद्यार्थी किती वाजता आला आणि किती वाजता उतरला या वेळेसह त्याची दैनिक उपस्थिती नोंद बंधनकारक करण्यात आली आहे. तसंच पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनात महिला परिचारिका आवश्यक असणार आहे.*

*विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणं आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग पालकांना करता येईल. याशिवाय पॅनिक बटण, अग्निसुरक्षा यंत्रणा, CCTV तसेच सर्व सीट्ससाठी सीट बेल्ट सक्तीचे आहेत. बस चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र देणं ही सरकारनं अनिवार्य केलं आहे.*

*आता प्रत्येक शाळेत परिवहन समिती कार्यरत असेल आणि भाडे, सुरक्षितता आणि सेवा यासंबंधी पालकांच्या तक्रारींचे निवारण समितीच्या माध्यमातून होईल. शिक्षण आणि परिवहन विभाग संयुक्तपणे शालेय वाहतुकीची नियमित तपासणी करणार असून, त्याचे अहवाल जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर केले जातील. नवीन नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत सर्व शालेय वाहने नियमांनुसार सुसज्ज करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.)*

**<><><><><><>**

केंद्र सरकारनं डिझेलवरील निर्यात शुल्क प्रति लिटर 21 रुपये पन्नास पैश्यांवरून 55 रुपये पन्नास पैसे प्रति लिटर इतकं वाढवलं आहे. अर्थ मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, विमान इंधनावरचं निर्यात शुल्कही 29 रुपये पन्नास

पैश्यांवरुन 42 रुपये प्रति लिटर करण्यात आलं आहे. दरम्यान, पेट्रोलवरील निर्यात शुल्क मात्र शून्य रुपयेच कायम ठेवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मार्च महिन्यापासून देशातल्या पाइप नॅचरल गॅसच्या ग्राहकांमध्ये ४ लाख १५ हजारांनी वाढ झाली आहे. याशिवाय साडे ४ लाखांहून अधिक ग्राहकांनी यासाठी नोंदणी केल्याची माहिती केंद्र सरकारनं दिली आहे. जवळपास २६ हजार पीएनजी ग्राहकांनी एलपीजी जोडणी काढून टाकली आहे. देशभर काल दिवसभरात ५१ लाख ५० हजार घरगुती गॅस सिलेंडरचं वितरण केल्याची माहिती सरकारनं दिली आहे. ५ किलो वजनाचे घरगुती वापराचे १२ लाखांहून अधिक एल पी जी सिलेंडर गेल्या २३ मार्चपासून विकल्याचं सरकारनं सांगितलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कटवा, जांगीपूर आणि कूष्मांडीमध्ये तीन सभा घेतल्या. भाजप निवडून आल्यास तृणमूल काँग्रेस करत असलेलं तुष्टीकरणाचं राजकारण संपवून समान नागरी कायद्याची अंमलबजावणी करण्याचं आश्वासन मोदी यांनी सभेत बोलताना दिल. या तीन प्रचारसभांनंतर मोदी यांनी सिलिगुडीमध्ये एका रोडशो मध्येही भाग घेतला.

भाजपचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी बांकुरा इथे प्रचारसभेत बोलताना बिष्णुपूर इथे बटाटा बीज उत्पादन केंद्राची उभारणी करण्याचं, तसंच बालुचेरी साडी आणि पंचमुरा टेराकोटा कलेला जीआय टॅग मिळवून देण्याचं आश्वासन दिलं. तृणमूल काँग्रेस केंद्राकडून मिळालेला निधी चुकीच्या मार्गाने खर्च करत असल्याची टीका त्यांनी यावेळी केली. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज पश्चिम मिदनापूर आणि झाग्राम इथे प्रचारसभा घेतल्या. एनआरसीद्वारे धार्मिक ध्रुवीकरण करून भाजप बंगालमध्ये दुफळी माजवत असल्याची टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

निवडणूक आयोगाने तामिळनाडूचे गृहसचिव धीरज कुमार यांची बदली केली आहे. मणिवासन हे आता तामिळनाडूचे नवे गृहसचिव असतील. यापूर्वी निवडणूक आयोगाने मुख्य सचिव एन. मुरुगानंदम, पोलीस महासंचालक दक्षता डेव्हिड देवसिर्वथम आणि चेन्नईचे पोलीस आयुक्त अरुण यांचीही बदली केली होती.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराणमध्ये आज शांतताविषयक वाटाघाटी सुरू झाल्या. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये पाकिस्तानच्या मध्यस्थीनं या चर्चा सुरू आहे. सुरुवातीला पाकिस्तानी प्रतिनिधींच्या माध्यमांतून संदेशांची देवाण-घेवाण सुरू आहे. त्यात सकारात्मक प्रतिसाद आढळून आला तर प्रत्यक्ष चर्चांना सुरुवात होईल, असं पाकिस्ताननं म्हटलं आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड व्हाइस कास्ट उमा**

*(अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे डी व्हान्स आणि इराणचे संसद अध्यक्ष मोहम्मद बाघेर घालिबाफ हे चर्चेसाठीच्या शिष्टमंडळाचं नेतृत्त्व करत आहेत. व्हान्स यांच्याबरोबर मध्यपूर्वेसाठीचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे जावई जॅरेड कुशनर आहेत. इराणच्या शिष्टमंडळात त्यांचे परराष्ट्रमंत्री अब्बास अरागची आणि इतर दोन उच्चस्तरीय प्रतिनिधी आहेत.*

*अमेरिकेनं स्वतःच्या हिताला प्राधान्य दिलं तर शांतता करार होऊ शकतो. पण इस्त्राइलच्या हिताला प्राधान्य दिलं तर करार होणार नाही, अशी भूमिका इराणचे उपाध्यक्ष मोहम्मद रेझा अरेफ यांनी मांडली. या चर्चा अपयशी ठरल्या आणि अमेरिका तसंच इस्त्राइलनं युद्ध पुन्हा सुरू केलं तर जगाला मोठी किंमत चुकवावी लागेल असा इशारा त्यांनी दिला.*

*या वाटाघाटींमधून पश्चिम आशियातल्या युद्धपरिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा निघेल अशी आशा पाकिस्तानचे प्रधानमंत्री शाहबाझ शरीफ यांनी व्यक्त केली आहे,)*

**<><><><><>**

अमेरिकेच्या नासा ने आर्टेमिस २ या चांद्रमोहिमेवर पाठवलेल ओरायन हे अंतराळयान आपल्या ४ अंतराळवीरांसह सुखरूप परत आलं आहे. पृथ्वीच्या

कक्षेत प्रवेश करताना या यानाचा वेग ध्वनीच्या वेगाहून ३३ पटीने जास्त होता त्यामुळे होणाऱ्या घर्षणामुळे त्याचा पृष्ठभाग आगीने वेढला गेला होता. परंतु त्याच्या अग्निरोधक कवचामुळे आतल्या अंतराळवीरांना कोणतीही इजा न होता ते प्रशांत महासागरात पडलं. या यानाने आपल्या १० दिवसांच्या प्रवासात चंद्राभोवती प्रदक्षिणा घातली आणि त्यामुळे पृथ्वीवरून कधीच न दिसणाऱ्या चंद्राच्या विरुद्ध भागाचं दर्शन त्यांना घडलं.

या मोहिमेमुळे ५० वर्षानंतर पुन्हा चंद्रापर्यंत मजल मारणारा हा पहिला अंतराळवीर चमू ठरला असून त्यांनी केलेला प्रवास हा आतापर्यंतचा मानवाने केलेला सर्वात मोठ्या अंतराचा अंतराळ प्रवास ठरला आहे.

**<><><><><><>**

आयपीएलमध्ये आज पंजाब किंग्सनं सनराइजर्स हैदराबादला ६ गड्यांनी पराभूत केलं. प्रथम फलंदाजी करताना सनराइजर्स हैदराबादनं निर्धारित २० षटकांत ६ बाद २१९ धावा केल्या. पंजाब किंग्सनं १८ षटक आणि ५ चेंडूत ४ गडी गमावून सामना जिंकला.

आजचा दुसरा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल दरम्यान चेन्नईत सुरू आहे. यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा चेन्नईच्या ९ व्या षटकात १ बाद ७८ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><><>//**